१३. संतवाणी

(अ)

संत सेना महाराज : (इ. स. तेराव्या शतकाचा उत्तरार्ध) प्रसिद्ध संतकवी. संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांचे समकालीन संत सेना महाराज पंढरीचे वारकरी होते. त्यांच्या नावावर सुमारे १५० अभंग आढळतात.

संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन प्रस्तुत अभंगामध्ये केले आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

आजि सोनियाचा दिवस ।
दृष्टीं देखिलें संतांस ।।१।।

जीवा सुख झालें ।
माझें माहेर भेटलें ।।२।।

अवघा निरसला शीण ।
देखतां संतचरण ।।३।।

आजि दिवाळी दसरा ।
सेना म्हणे आले घरा ।।४।।

सकलसंतगाथा खंड पहिला : संत सेना अभंग
अभंग क्रमांक १५
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

भावार्थ– संत सेना महाराज संतभेटीने झालेल्या आनंदाचे वर्णन करताना म्हणतात, ''संतांच्या दर्शनाने आजचा दिवस सोनियाचा झाला असून ज्याप्रमाणे सासरी गेलेल्या मुलीला माहेरी आल्याने आनंद होतो तसा आनंद मला झाला आहे. या आनंदाचे वर्णन करताना पुढे ते म्हणतात, संतचरण दृष्टीला पडल्याने माझा सगळा शीण नाहीसा झाला असून घरी दिवाळी, दसरा या सणांसारखा उत्साह ओसंडून वाहू लागला आहे.''

शब्दार्थ : आजि – आज. **देखिलें** – पाहिले. **अवघा** – संपूर्ण. **शीण** – थकवा. **निरसणे** – दूर होणे, नाहीसा होणे.

(आ)

संत चोखामेळा : प्रसिद्ध संतकवी. संत चोखामेळा यांचा जन्मशक उपलब्ध नाही. संत चोखामेळा यांच्या अभंगांतून भक्ताच्या हृदयातील कारूण्य जसे प्रकट होते, तशी सामाजिक विषमतेच्या उपेक्षेची खंतही व्यक्त होताना दिसते. भागवत धर्माचे सार त्यांच्या व्यक्तित्वात, त्यांच्या कृती-उक्तीत अनुभवायला मिळते.

संतांच्या सहवासात राहून मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन प्रस्तुत अभंगात केले आहे.

• ऐका. वाचा. म्हणा.



चंदनाच्या संगें बोरीया बाभळी ।
हेकळी टाकळी चंदनाची ।।१।।

संतांचिया संगें अभाविक जन ।
तयाच्या दर्शनें तेचि होती ।।२।।

चोखा म्हणे ऐसा परमार्थ साधावा ।
नाहीं तरी भार वाहावा खरा ऐसा ।।३।।

सकलसंतगाथा खंड पहिला : संत चोखामेळा अभंग
अभंग क्रमांक ६७
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

भावार्थ– संत चोखामेळा म्हणतात, ''ज्याप्रमाणे चंदनाच्या सहवासात बोरी, बाभळी, अन्य झाडे व झुडपे आली तर ती चंदनाप्रमाणे सुगंधी होतात त्याप्रमाणे संतांच्या सहवासातही आलेले सर्वजण भाविक बनतात. मनुष्य जन्माला येऊन परमार्थ साधावा नाहीतर आपले जीवन भूमीला भारभूत ठरेल.''

शब्दार्थ : संगे – सोबत **दर्शनें** – दर्शनाने **हेकळी** – वाकडी. **टाकळी** – लहान झुडूप. **अभाविक** – भाविक नसलेले **खर** – गाढव.

❁❁❁

- खालील आकृतीत नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांची उदाहरणे दिली आहेत. त्यांचा उपयोग करून अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.



उदा., १. तुषार गुणी आहे.

२. तो पिवळा चेंडू खेळतो.

३. तुषारला मिठाई आवडते.

हे नेहमी लक्षात ठेवा.



जीव धोक्यात घालू नका,
दरीत डोकावून पाहू नका.

भर रस्त्यात गाडी थांबवू
नका, इतरांना जाण्यासाठी
व्यत्यय आणू नका.

- घाटातून जाताना घ्यायची काळजी याविषयीचे सूचनाफलक तयार करा.



(इयत्ता आठवीतील मीनल व इयत्ता दहावीतील तेजस या दोन बहीणभावंडांतील हा संवाद.)

तेजस : मीनल, ए मीनल. अगं, आता आपली शाळा लवकरच सुरू होणार आहे. आपण यावर्षी आणलेली नवीन पुस्तकं वाचायला हवीत. तू यावर्षीची नवीन पुस्तकं पाहिलीस का?

मीनल : हो दादा, अरे मी पुस्तकं वाचली नाहीत; पण बघितली आहेत.

तेजस : आवडली का तुला तुझी पुस्तकं?

मीनल : अरे, मला तर माझी पुस्तकं खूपच आवडली. मागील वर्षापेक्षाही या वर्षीची पुस्तकं खूपच सुरेख आहेत. नव्या कोऱ्या पुस्तकांचा सुगंध, त्यातील आकर्षक चित्रे, पाठांची मांडणी मला खूपच आवडली.

तेजस : अगं, मला पण माझी पुस्तकं खूप आवडली आहेत. अभ्यास करताना नक्कीच मजा येणार आहे.

मीनल : अरे, पण नवीन पुस्तकांत सर्व धड्यांखाली चौकटीत काहीतरी दिलेले आहे. ते काय आहे मला कळलंच नाही.

तेजस : दाखव बरं मला काय आहे ते!

मीनल : हे बघ. (पुस्तकातील पाठाखालील क्यू. आर. कोड दाखवते.)

तेजस : अगं, मीनल हा तर क्यू. आर. कोड आहे.

मीनल : क्यू. आर. कोड म्हणजे काय रे दादा? पूर्वीच्या पुस्तकांत तर असं काही दिलं जात नव्हतं!

तेजस : अगं, क्यू. आर. कोड म्हणजे क्विक रिस्पॉन्स कोड (Quick Response Code). अगं, मोबाईलवर क्यू. आर. कोड स्कॅनर हे ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर डाऊनलोड करावे लागते. या सॉफ्टवेअरद्वारे हा क्यू. आर. कोड स्कॅन केल्यानंतर आपल्याला पाठ, कविता, इतर घटक या संबंधीच्या काही लिंक्स दिसतात. त्याद्वारा ऑडिओ, व्हिडिओ तसेच इतर पूरक साहित्य आपल्याला पहायला मिळते. आपण ते ऐकू शकतो, पाहू शकतो आणि वाचूही शकतो. अभ्यासासाठी त्याचा आपल्याला पुन्हा पुन्हा वापरही करता येऊ शकतो.

मीनल : अरे, हे तर खूपच छान आहे! आपल्या पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधीची माहिती खूपच कमी वेळात उपलब्ध होत असल्यामुळे विविध प्रकारचे साहित्य व माहिती शोधण्यासाठीचा आपला वेळही वाचणार आहे. चल दादा, आपण लगेच आपल्या मोबाईलवर हे ॲप डाऊनलोड करून घेऊया आणि अधिकाधिक माहिती मिळवूया.

काही पूरक पुस्तके व संदर्भ ग्रंथ

(१) बहिणाबाईंची गाणी– बहिणाबाई चौधरी
(२) फकिरा– अण्णा भाऊ साठे
(३) पूर्वरंग– पु. ल. देशपांडे
(४) विशाखा (कवितासंग्रह)– कुसुमाग्रज
(५) गर्भरेशीम (कवितासंग्रह)– इंदिरा संत
(६) तराळ-अंतराळ– शंकरराव खरात
(७) पक्षी जाय दिगंतरा– मारुती चितमपल्ली
(८) फिरस्ती– उत्तम कांबळे
(९) आमचा बाप आणि आम्ही– डॉ. नरेंद्र जाधव
(१०) मजेत जगावं कसं?– शिवराज गोर्ले
(११) मास्तरांची सावली– कृष्णाबाई सुर्वे
(१२) निसर्गायन– दिलीप कुलकर्णी
(१३) जोहड– सुरेखा शहा
(१४) पत्रास कारण की....– अरविंद जगताप
(१५) विविध शब्दकोश व मराठी विश्वकोश

महत्त्वाची संकेतस्थळे व लिंक्स

https://mr.wikipedia.org/wiki/**जगदीश_खेबुडकर**
http://youtu.bevsQjx2B-73w
http:youtu.beSlygTWH4JNo
https://en.wikipedia.org/wiki/Vasant_Bapat
https://mr.wikipedia.org/wiki/**शांता_शेळके**
www.shikshansanjivani.com > Thor-Leader
https://mr.wikipedia.org/wiki/**चोखामेळा**

शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात दिलेली पूरक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकांशी संबंधित माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.

- खालील चित्राचे निरीक्षण करा. चित्रातील हे दृश्य पाहून सूचनांचे फलक तयार करा.



- खालील चौकटींत काही म्हणींचे अर्थ दिले आहेत ते वाचा. त्यावरून म्हणी ओळखा व लिहा.

न आवडणाऱ्या माणसाने कितीही चांगली गोष्ट केली, तरी ती वाईट दिसते. त्या व्यक्तीचे काम आवडत नाही.	एखाद्या माणसाला काम करता येत नसले, की तो कारणे देत असतो.
एखादी गोष्ट तत्काळ व्हावी याकरता काही लोक उतावळेपणाने जे उपाय करतात त्यांना हे म्हटले जाते.	जे समोर दिसते त्यासाठी कोणत्याही पुराव्याची गरज भासत नसते.



















- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी सुलभभारती इयत्ता आठवी

₹ ३०.००